दिनांक 21/03/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 183

विषय – विटा नगरपरिषद मालकीच्या घोगांव जॅकवेलमधील गाळ काढणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 21/03/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा शहराला पिण्याचा पाणी पुरवठा करणारे जॅकेवल कृष्णा नदी काठाला घोगांव येथे असून मागील काही वर्षामध्ये आलेल्या महापूरामुळे जॅकवेल मध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचलेला आहे असे तपासणीत आढळून आले आहे. त्यामुळे पंपाचा डिस्चार्ज प्रमाणापेक्षा कमी मिळत असून त्याचा शहराच्या पाणी पुरवठ्यावर गंभीर परिणाम झाला आहे. तसेच सदर गाळामुळे पंप ब्लॉक होऊन त्याचा दुरूस्ती खर्च मोठा निघू शकतो हे टाळणेसाठी सदर जॅकवेल मधील गाळ तातडीने काढणे आवश्यक आहे. तरी विटा नगरपरिषद मालकीच्या घोगांव जॅकवेलमधील गाळ काढणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 21/03/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.184

विषय – विटा नगरपरिषदेच्या ट्रॅक्टर ट्रॉलीवर 5000 लि. क्षमतेचे पाणी टँकर बसविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 21/03/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी डिव्हायडरमध्ये, ग्रीन बेल्टमध्ये मोठ्या प्रमाणात रोपांची लागवड करण्यात आली आहे. सध्या या रोपांना पाणी पुरवठा करणेकामी ट्रॅक्टरवरील पाणी टँकरचा वापर केला जातो. विटा शहराचे कार्यक्षेत्र मोठे असल्याने ट्रॅक्टर वरील पाणी टँकर विविध धार्मिक कार्य, मयतकार्य, लग्नकार्य तसेच विविध समारंभकामी वापरले जाते. रोपांना पाणी पुरवठा करणेसाठी स्वतंत्र पाणी टँकर असणे आवश्यक आहे. स्वतंत्र पाणी टँकरची सोय झालेस लागवड केलेल्या रोपांना पाणी पुरवठा करणे सोईचे होईल. सध्या विटा नगरपरिषदेकडे जुनी ट्रॅक्टर ट्रॉली असून सदर वाहनावर पाणी टँकर बसविणे सोईचे होईल.

तरी विटा नगरपरिषदेच्या जुन्या ट्रॅक्टर ट्रॉलीवर 5000 लि. क्षमतेचे पाणी टँकर GeM पोर्टलवरून खरेदी करुन बसविणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा